DPDC

161

ट्रस्ट रजि. नं. A ३४९(अ.नगर) ॥श्री मळगंगा प्रसन्न॥ स्थापना सन-१९९४

# श्री मळाई वडजाई देवस्थान, ट्रस्ट

श्री क्षेत्र चिंचोली, ता.पारनेर, जि.अहमदनगर, पिन- ४१४ ३०२

PAN NO.: AALTS9383F

जा.क्रं. : क. वर्ग/२४ दिनांक : २४/६/२०२४

प्रति,

१) **मा.जिल्हाधिकारी व मेंबर सेक्रेटरी**
जिल्हा नियोजन समिती,
अहमदनगर

२) **मा.पालक मंत्री व मा.अध्यक्ष ना.राधाकृष्ण विखे पाटील**
जिल्हा नियोजन समिती,
अहमदनगर

**विषय : <u>क वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजना</u>**
श्री.मळाई वडजाई देवस्थान ट्रस्ट चिंचोली, ता.पारनेर येथे पाण्याची टाकी बांधणे व नळाद्वारे पाणीपुरवठा करणे.

**संदर्भ :** १) मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं) जि.प. अहमदनगर सामान्य प्रशासन विभाग २ यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश दि.२२/०३/२०२१
२) आमचे ट्रस्टचे पत्र जा. क्र. क वर्ग दि.२८/११/२०२३ व दि.१९/१२/२०२३

महोदय,

**<u>विषयांकित कामे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विनंती की,</u>**

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात आमचे देवस्थानसाठी रु.१० लाख रुपये मंजुर करण्यात आले आहे.तथापि वर्क ऑर्डरनुसार संबंधित कॉन्ट्रॅक्टर यांनी मार्च २०२२ अखेर कोणतेही काम केलेले नाही.

त्याबाबत पारनेर पं.स. कार्यालयात चौकशी केली असता सदरहू कामाची मंजूर रक्कम कमी असल्याने कॉन्ट्रक्टरने काम केलेले नाही. आम्ही सुधारीत इस्टीमेट करु असे सांगण्यात आले.

यासाठी आम्ही संदर्भीय दि.२८/११/२०२३ व १९/१२/२०२३ रोजी स्मरणपत्रान्वये विनंतीही केलेली आहे. यावर विषयांकित काम होणेकामी संबंधीत यंत्रणेने

सूचविलेनुसार २५ लाख रुपयाचे सुधारीत अनुदान मंजुरीकामी पत्रही दिले. परंतु त्यावर अद्यापपावेतो मार्च २०२४ अखेर मंजुर रक्कमेचे कामही केले नाही किंवा सुधारीत २५ लाख रुपये मंजुरीकामी काही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

अवर्षण प्रवण डोंगरी भागातील आमचे देवस्थानला भेट देणारे भाविकासाठी पाण्याची टाकी व नळाद्वारे पाणीपुरवठा होणे अत्यंत गरजेचे आहे.

तरी आपणास पुनश्च विनंती करण्यात येते की, आगामी जिल्हा नियोजन समितीचे (DPC) बैठकीमध्ये आमचे देवस्थानसाठी प्राधान्य क्रमाने सुधारीत रु. २५ लाख अनुदान मंजुर करण्यास विनंती आहे.

श्री मळाई वडजाई देवस्थान ट्रस्ट
चिंचोली, ता. पारनेर, जि. अ.नगर
चेअरमन सचिव/ट्रस्टी

**सोबत -**

१. प्रशासकीय मान्यता आदेश दि.२२/०३/२०२१ ची प्रत
२. आमच्या ट्रस्टचे पत्र दि.२८/११/२०२३ व दि.१९/१२/२०२३ ची छायांकित प्रत.

**प्रत -**

१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जिल्हा परिषद अहमदनगर
२. मा.कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा योजना, जि.प.अहमदनगर
३. मा.गटविकास अधिकारी, पं.स. पारनेर
४. मा.खा.निलेशजी लंके साहेब (MP) अहमदनगर

२/- कृपया विषयांकित कामी आपल्या स्तरावर आवश्यक पुर्तता होऊन समकार्यवाहीसाठी सविनय सादर

प्रशासकीय मान्यता

**सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी क वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत**

**जिल्हा परिषद अहमदनगर**
**सामान्य प्रशासन विभाग-२**
**जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-९/४२४-६/२०२१**
**दिः- २२ मार्च, २०२१**

**वाचा:-** १.ग्रा.वि.व.ज.सं.विभाग, शासन निर्णय क्र — तिर्थवि-२०११/प्र.क्र.६५१/यो-७, दि:-१६/११/२०१२
२.नियोजन विभाग, शासन निर्णय क्र:जिवायो १००७/प्र.क्र.३९/का-१४४४, दि:-१६ फेब्रुवारी, २००८
३.नियोजन विभाग, शासन निर्णय क्र:डिएपी-१०१४/प्र.क्र.२९५/का.१४८१, दि:-१७ डिसेंबर, २०१४
४.ग्रा.वि.विभाग, शासन निर्णय क्र-झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि:-०७ ऑक्टोबर, २०१७

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत ग्रामीण विभागातील तिर्थक्षेत्र यांच्या विकासाबाबत 'क' वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत खालील नमूद कामास संदर्भीय शासन निर्णयान्वये मंजुरी दिलेली आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | रक्कम(रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | श्री मळाई वडजाई देवस्थान, चिंचोली ता.पारनेर येथे पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे व परिसरात नळाव्दारे पाणी पुरवठा करणे | १०.०० |

ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत ग्रामीण विभागातील तिर्थक्षेत्र यांच्या विकासाबाबत 'क' वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत ग्राम विकास विभागाकडील उपरोक्त संदर्भ ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम १९६८ चे नियम ४ परिशिष्ट २ अन्वये सोबतचे परिशिष्टामधील नमुद मंजुर कामांना एकुण रक्कम रूपये १०.००/- लक्ष निधीस खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीना अधीन राहून प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत ग्रामीण विभागातील तिर्थक्षेत्र यांच्या विकासाबाबत 'क' वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजने अंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन सोबतचे परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या कामांना निधी मंजुर केलेला असुन, मंजुर निधीच्या मर्यादेत सदर कामांस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सदर मंजुर कामांच्या यादीत संदर्भाधीन शासन निर्णय क्र १ अन्वये विहीत केलेल्या कामांव्यतिरिक्त कामे असतील तर अशी योजनाबाह्य कामे तसेच जी कामे जागेचा अभाव, इतर योजनेंतर्गत या आधी मंजुर असतील किंवा इतर काही कारणांमुळे सुरु करणे शक्य नसतील अशा कामांची शहानिशा करुन त्या कामांची यादी तात्काळ ग्रामपंचायत विभागास सादर करणेची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांची राहील.

सदर बाबीवर होणारा खर्च मागणी क्र ओ-४२, अंतर्गत ३६०४ - स्थानिक संस्था व पंचायत राज संस्था यांना नुकसानभरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे (३६०४०७०१) यात्रास्थळांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम ५०, इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्येत यावा. सदर आदेशान्वये मंजुर करण्यात आलेली सोबतच्या परिशिष्टामधील नमुद कामे दि:-३१ मार्च २०२२ पर्यंत पुर्ण करण्यात यावीत. तसेच सदरचे अनुदान सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात मंजुर करणेत आलेले असलेने, सदरचा निधी खर्च करणेसाठी माहे मार्च २०२२ अखेर मुदत राहील.

**<u>अटी व शर्ती:-</u>**

१.सदर प्रशासकीय आदेश मिळताच कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांनी मंजुर कामांचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह तयार करुन घेवुन (अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसह) आपले स्तरावर कायमस्वरुपी जतन करुन ठेवावेत.

२.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या तिर्थक्षेत्रास मा.जिल्हा नियोजन समितीव्दारे क वर्ग दर्जा प्राप्त आहे किंवा नाही याबाबत कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांनी खात्री करावी.

३.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या सर्व कामांसाठी जिल्हा परिषदेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार तांत्रिक मंजुरी, निविदा काढणे / स्वीकारणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिका-याकडुन करुन घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांची राहील.

४.सदर मंजुर कामांना कार्यारंभ आदेश हा उक्त नमुद कालमर्यादितच (दि:-३१ मार्च २०२२) देवुन, विहित कालावधीतच संबधित कामे पुर्णत्वास आणावीत. विहित केलेल्या कालावधीनंतर कार्यारंभ आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५.सदर मंजुर निधी त्याच कामासाठी खर्च करावयाचा असुन, सदरील कामे मंजुर अनुदानाच्या मर्यादेतच पुर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करु नये. तसेच मंजुर किंमतीपेक्षा जास्त होणारा खर्च संबधित देवस्थान ट्रस्ट / ग्रामपंचायतीस करावा लागेल.

६.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली सर्व कामे इतर योजनेतुन मंजुर नाहीत / प्रस्तावित नाहीत किंवा यापुर्वी झालेली नाहीत याची खातरजमा करणेची जबाबदारी ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / उपअभियंता (संबधित उपविभाग) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) / कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांची राहील. तसेच सदर कामे पुर्ण झालेनंतर त्यांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी संबधित देवस्थान ट्रस्ट / ग्रामपंचायत यांची राहिल. तसेच त्यासाठी कोणतेही अनुदान देण्यात येणार नाही.

७.सदर मंजुर कामे संबधित देवस्थान ट्रस्ट / ग्रामपंचायत मालकीच्या जागेतच करावयाचे असुन जागेअभावी काम रद्द होणार नाही याची खबरदारी घ्यावी व मंजुर काम मंजुर ठिकाणीच करणेत यावे. तसेच मंजुर काम जिल्हा परिषद / सरकार जागेत करावयाचे असल्यास, जिल्हा परिषदेची / मा.जिल्हाधिकारी यांची परवाणगी घेणे बंधनकारक राहिल.

८.सदर मंजुर कामांचा दर्जा व गुणवत्ता ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मानंकाप्रमाणे असावीत. ती तशी नसल्यास कंत्राटदार / कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांना सामुहिक व वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

९.सदर मंजुर सर्व कामांची राज्य गुणवत्ता निरिक्षक (एस.क्यु.एम) यांचेकडुन शासन निर्णयानुसार तपासणी करुन घेण्यात यावी.

१०.सदर कामांबाबत जनतेच्या तक्रारी उद्भवल्यास कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांनी समक्ष संबधित कामाची तक्रारीच्या अनुषंगाने शहानिशा करावी.

११.उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व अटी व शर्ती लागु राहीतील.

१२.सदर आदेशासोबतच्या परिशिष्टामध्ये नमुद केलेली कामे माहे मार्च २०२२ पर्यंतच पुर्ण करुन त्यावरील मंजुर निधी ग्रामपंचायत विभागाकडुन माहे मार्च २०२२ पर्यंतच प्राप्त करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांची राहील.

१३.सदर कामे पुर्ण झालेनंतर शासकीय कपाती (रॉयल्टी, लेबर सेस, आयटी टॅक्स, सर्व्हीस टॅक्स, जीएसटी इ.) करण्यात येवुन त्यांचा मुदतीत भरणा करणेचे जबाबदारी संबधित विभागाची / यंत्रणेची राहील.

१४.देवस्थान ट्रस्ट / ग्रामपंचायत यांना स्वनिधीतुन काही कामे करावी लागतील.

१५.देवस्थान ट्रस्टला त्यांचे स्तरावर भक्तगणांकडून इतर कोणतेही कर किंवा भक्तनिवास वापरासंबंधीचे भाडे शासनाच्या परवानगीशिवाय आकारता येणार नाही.

१६.यात्रास्थळाचे / तिर्थक्षेत्राचे ठिकाणी शासन खर्चाने जी विकास कामे करण्यात येतील, त्या संबंधीच्या नोंदी संबधित देवस्थान ट्रस्ट यांचे मालकीच्या जमिनीचे ७/१२ उतारे गटाचा नमुना ६ हक्कांचे पत्रक यामध्ये घेण्यात येतील. त्यावेळी विश्वस्तांना तशा नोंदी घेणे बाबत संमतीपत्रके देणे बंधनकारक राहील. याबाबत शासन स्तरावरील निर्णय अंतिम राहील.

१७.शासनामार्फत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांमध्ये कोणतेही धार्मिक कार्य करण्यात येऊ नये.

१८.शासनामार्फत उपलब्ध करण्यात आलेल्या शासकीय निधीतुन सुविधा देण्यात आलेली आहे, अशा प्रकारचे फलक दर्शनी भागास लावण्याचे बंधनकारक राहील.

१९.सदर आदेशासोबतच्या परिशिष्टामधील नमुद केलेली विकास कामे हाती घेण्यापुर्वी संबधित क्षेत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका / पोट निवडणुकांसाठी आचारसंहिता अंमलात नाही याबाबत कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांनी खात्री करावी. तसेच सदर कामे दर्जेदार व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत विहित समिती / संबधितांकडुन खात्री करुन घेण्यात यावी. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी. याबाबत कार्यकारी अभियंता (संबधित विभाग) यांनी विशेष दक्षता घ्यावी, अन्यथा कसुरदारांवर कारवाई करण्यात येईल.

२०.सदर मंजुर कामांचे देयक (धावते/अंतिम) अदा करणेपुर्वी देयक नस्तीवर ग्रामपंचायत विभाग प्रमुखांची प्रतिस्वाक्षरी घेणेची जबाबदारी संबधित विभागाची / यंत्रणेची राहील.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति,
१.कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.(उत्तर/दक्षिण)/ग्रा.पा.पु/ल.पा.विभाग, अहमदनगर.

प्रत :- जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, अहमदनगर.
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर.
प्रत :- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.(उत्तर/दक्षिण)/ग्रा.पा.पु/ल.पा.विभाग, अहमदनगर.
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती------------------------
प्रत :- उपअभियंता, जि.प.सा.बा/ल.पा/ग्रा.पा.पु, उपविभाग--------------------------

ट्रस्ट रजि. नं. A ३४९(अ.नगर) ।।श्री मळगंगा प्रसन्न।। स्थापना सन-१९५४

# श्री मळाई वडजाई देवस्थान,ट्रस्ट

श्री क्षेत्र चिंचोली,ता.पारनेर,जि.अहमदनगर,पिन- ४१४ ३०२

PAN NO.: AALTS9383F

मळगंगा माता मुख्य ठाणे

जा.क्रं. : क्र.पत्र/23 दिनांक : 28/11/2023

प्रति,

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब,**

जिल्हा परिषद, अहमदनगर

28/11/2023

महसूल सहायक

**विषय :** क वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजना

श्री.मळाई वडजाई देवस्थान ट्रस्ट, चिंचोली, ता.पारनेर पाण्याची टाकी व नळ पाणी पुरवठा करणे.

**संदर्भ :** मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.अहमदनगर सामान्य प्रशासन विभाग २ यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश दि.२२/०३/२०२१

महोदय,

विषयांकित कामी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विनंती की,

सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात आमचे देवस्थानसाठी पाण्याी टाकी- नळ पाणीपुरवठा योजना रु.१०,००,०००/- प्रशासकीय मान्यतेने मंजुर करण्यात आले आहे. त्या कामाचा भूमिपुजन कार्यक्रमही संपन्न झालेला आहे. त्याचे कॉन्ट्रॅक्ट श्री. नितीन औटी, पारनेर किंवा इतर यांना देण्यात आले होते. परंतु मार्च २०२२ अखेर सदरहू ठेकेदाराने काम पूर्ण केले नाही.

आवक लिपीक
मध्यवर्ती टपाल कक्ष
जिल्हा परिषद, अहमदनगर

त्याबाबत पारनेर पं.स.कार्यालयात चौकशी केली असता सदरहू कामाचे इस्टीमेट कमी रकमेचे असल्याने कॉन्ट्रॅक्टरने काम केले नाही, आम्ही सुधारीत इस्टीमेट करु असे सांगण्यात आले. तथापि त्याबाबत पुढे काय हालचाल - प्रगती - काम होणार किंवा नाही याचे कोठेही समर्पक उत्तर- प्रतिसाद मिळत नाही.

विस्तार सहाय्यक
ग्रा पु का. अ.
अहमदनगर.

28/11/2023

..२..

म्हणून कृपया आपणास विनंती की, चालू सन २०२३-२४ या वर्षात प्राधान्य क्रमाने विषयांकित काम मंजूर होऊन पूर्ण करणेबाबत विनंती आहे.

सोबत - प्रशासकीय मान्यता आदेश दि.२१/०३/२०२१ ची प्रत

आपला विश्वासू

श्री [illegible] ट्रस्ट
पिंपळी, ता. पारनेर, जि. अ.नगर

चेअरमन सचिव/ट्रस्टी

प्रत -

१. मा.अहमदनगर जिल्हा पालक मंत्री, ना.विखे साहेब
२. मा.कार्यकारी अभियंता, दक्षिण विभाग (सां.बा.) जि.प.अहमदनगर
३. मा.कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा योजना, जि.प.अहमदनगर
४. मा.जिल्हा नियोजन अधिकारी (जि.नि.समिती), अहमदनगर
५. मा.गटविकास अधिकारी, पं.स.पारनेर

२/- कृपया विषयांकित कामी आपले स्थरावर आवश्यक पुर्तता होऊन सम कार्यवाहीसाठी सविनय सादर.

9422232400

ट्रस्ट रजि. नं. A ३४९(अ.नगर) ।।श्री मळगंगा प्रसन्न।। स्थापना सन-१९५४

# श्री मळाई वडजाई देवस्थान,ट्रस्ट

श्री क्षेत्र चिंचोली,ता.पारनेर,जि.अहमदनगर,पिन- ४१४ ३०२

PAN NO.: AALTS9383F

जा.क्र. : २४ दिनांक : १५/१२/२०२३

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब,**
जिल्हा परिषद, अहमदनगर

विषय : <u>क वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजना</u>
श्री मळाई वडजाई देवस्थान ट्रस्ट, चिंचोली, ता.पारनेर पाण्याची टाकी व नळ पाणी पुरवठा करणे.

संदर्भ : १) मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) जि.प.अहमदनगर सामान्य प्रशासन विभाग २ यांचेकडील प्रशासकीय मान्यता आदेश दि.२२/०३/२०२१
२) आमचे ट्रस्टचे पत्र जा.क्र. क वर्ग/२३ दि.२८/११/२०२३

महोदय,

<u>विषयांकित कामी उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विनंती की,</u>

सन २०२०-२०२१ या वर्षात आमचे देवस्थानसाठी १० लाख रुपये मंजूर झाले होते. (पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे व परिसरात नळाद्वारे पाणीपुरवठा करणे) यामध्ये फक्त पिण्याच्या पाण्याची टाकी होऊ शकते परंतु त्यासाठी आमचे विहिरीवरुन टाकीपर्यंत पाईपलाईन टाकणे, पंपींग मशनरीसह व मंदिर परिसरात वितरण व्यवस्था करुन पाणी पुरवठा करणे ही कामे केल्याशिवाय योजना पूर्ण होऊ शकत नाही. त्यासाठी वाढीव निधीची आवश्यकता आहे.

आमचे संदर्भीय पत्रात आमचेकडून ठेकेदार काम करीत नसल्याबाबत उल्लेख आहे. परंतु सर्व अनुषंगीक कामे करणेकरीता निधी अपुरा असल्याने काम होत नाही असे आम्हास

आवक लिपिक
जिल्हा परिषद, अहमदनगर

समजले. तरी याबाबत क वर्ग तिर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत किमान २५ लाख पर्यत अनुदान मिळावे जेणे करुन परिपूर्ण योजना होईल व त्याचा सर्वाना लाभ होईल.

म्हणून पुनश्च आपणास विनंती करण्यात येते की, सुधारीत इस्टीमेट करुन चालू सन २०२३-२०२४ या वर्षात प्राधान्य क्रमाने विषयांकित काम मंजूर होऊन पूर्ण करण्यास विनंती आहे.

सोबत :
दि.२८/११/२०२३ चे पत्र.

श्री ...
चेअरमन/ ... /ट्रस्टी

प्रत :
१. मा.अहमदनगर जिल्हा पालक मंत्री, ना.विखे साहेब
२. मा.कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा योजना, जि.प. अहमदनगर
३. मा.गटविकास अधिकारी, पं.स. पारनेर
४. मा. निलेशजी लंके पारनेर

२/- कृपया विषयांकित कमी आपले स्तरावर आवश्यक पुर्तता होऊन सम कार्यवाहीसाठी सविनय सादर.

① 1/12/23
आवक लिपीक
मध्यवर्ती टपाल कक्ष
जिल्हा परिषद, अहमदनगर